Sakal | 21st March 2007.

दोन मराठी मित्रांनी स्थापन केलेल्या 'संकल्पन' या इंटेरियर डिझाईन कंपनीने यशाची गुढी उभारत नुकताच आपल्या वाटचालीतील दशकाचा टप्पा पूर्ण केला.



# 'संकल्पन'ची भरारी!

दोन मराठी तरुण. एकमेकांचे मित्र. एकत्रच शिकले. एकाच विद्यापीठाची पदवी घेतली. त्यानंतर सगळेच मराठी तरुण करतात त्याप्रमाणे त्यांनीही नोकरीसाठी मुंबई गाठली. येथपर्यंत निनाद रणदिवे आणि अतिन कुलकर्णी या मध्यमवर्गीय वास्तुविशारदांची कथा अगदी चारचौघांसारखी, सरधोपट आहे. त्यांच्या आयुष्याला वळण लागले ते नोकरीत एक वर्ष काढल्यानंतर. दुसऱ्याची चाकरी करण्याची 'वहिवाट' सोडून त्यांनी स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याची बिकट वाट धरली.

ते वर्ष होते १९९५. लहानमोठी कामे करीत त्यांनी पुढच्याच वर्षी 'संकल्पन' ही इंटेरियर डिझाईन कंपनी सुरू केली. गेल्या दहा वर्षांच्या काळात या कंपनीने लहान-मोठे सहाशे प्रकल्प पूर्ण केले आहेत आणि २०१० पर्यंत एक हजार कोटी रुपयांचे प्रकल्प पूर्ण करण्याचा संकल्प सोडला आहे. एकाने कामे आणायची आणि दुसऱ्याने ती पूर्ण करायची. एकमेकांच्या कामात हस्तक्षेप करायचा नाही, ही पथ्ये पाळत आम्ही काम केले. दर्जेदार कामे, तीही वेळेवर पूर्ण करणे हा आमचा मूलमंत्र आहे. त्यामुळेच आमच्या कंपनीची वाटचाल देशातच नव्हे; तर परदेशातही सुरू आहे. त्यातूनच 'संकल्पन आर्किटेक्ट', 'संकल्पन इन्फ्रास्ट्रक्चर' आणि 'संकल्पन रिलेटर्स' या कंपन्यांची स्थापना करण्यात आली. दोन वर्षांपूर्वी सेंटर्ड क्लबकडून 'संकल्पन'चा झालेला गौरव आणि कंपनीला दर्जेदार कामासाठी मिळालेला 'आयएसओ ९००१:२०००' श्रेणी या आमच्यासाठी भूषणावह बाबी आहेत. टाइम्स बँकेच्या अंतर्गत सजावटीच्या कामापासून 'संकल्पन'चा शुभारंभ झाला. या कामातूनच त्यांच्या व्यवसायाला ब्रेक मिळाला. त्यानंतर वाशी रेल्वेस्थानक येथील व्यापारी संकुलातील 'आयसीआयसीआय'चे सर्वांत मोठे काम त्यांना मिळाले आणि 'संकल्पन'ची घोडदौड सुरू झाली. अलीकडेच त्यांनी मुंबईसह दिल्ली, चेन्नई, पुणे आणि बंगळूर येथे कार्यालये उघडलीत. दुबई आणि सिंगापूरलाही 'संकल्पन'ची कार्यालये आहेत. कंपनीकडे आजघडीला ४० वास्तुविशारदांसह २०० कर्मचारी आहेत. 'संकल्पन'चे हे यश मराठी माणसांसाठी निश्चितच प्रेरणादायी आहे.

■ मदन बडगुजर